आशियाई विकास बँकेमार्फत राज्यातील आरोग्य सेवेतील पायाभूत सुविधा उभारण्यासाठी उपलब्ध कर्ज निधीतून धाराशिव येथील ५०० खाटांच्या जिल्हा रुग्णालय बांधकामासाठी निधी वितरित करणेबाबत.

महाराष्ट्र शासन

सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः निधीवि-२०२६/प्र.क्र.२३८/पासु-२ (ई.क्र.१७२९०४२)

१० वा मजला, गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
लोकमान्य टिळक मार्ग, मंत्रालय, मुंबई-४०० ००१.
दिनांक: ०९ जुलै, २०२६.

वाचा: **१) शासन निर्णय,सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: स्थापना-२०२३/प्र.क्र.१२७/आरोग्य-४, दि.०१/०८/२०२३.**

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: स्थापना-२०२३/प्र.क्र.१२७/आरोग्य-४, दि.१६/०२/२०२४.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक: स्थापना-२०२३/प्र.क्र.१०३/आरोग्य-४, दि.१५/०३/२०२४.

४) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखालील दि. ०९/०४/२०२५ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

५) धाराशिव जिल्हा रुग्णालय बांधकामाबाबत मा.मंत्री (परिवहन) व मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य विभाग) यांच्या अध्यक्षतेखालील दि. ०६/०३/२०२६ रोजीच्या बैठकीचे इतिवृत्त.

६) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय मुंबई यांचे पत्र दि. २७/०१/२०२६.

७) अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव यांचे पत्र दि. १८/०६/२०२६.

प्रस्तावना -

धाराशिव जिल्ह्यातील आरोग्यसेवेची आवश्यकता विचारात घेऊन शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग दि. ०१/०८/२०२३ (संदर्भ क्र.१) अन्वये धाराशिव येथे नविन जिल्हा रुग्णालय उभारण्यास मान्यता देण्यात आली आहे. तद्नंतर शासन निर्णय दि.१६/०२/२०२४ (संदर्भ क्र. २) अन्वये सदर जिल्हा रुग्णालयाची क्षमता ५०० खाटांची करण्यात आली असुन ५०० खाटांचे नवीन रुग्णालय व निवासी कर्मचारी इमारत बांधकामाच्या रु. ३६१.५० कोटी इतक्या रकमेच्या अंदाजपत्रकास दि.१५/०३/२०२४ (संदर्भ क्र. ३) रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. धाराशिव जिल्हा रुग्णालय व निवासी इमारत बांधकामासंदर्भात प्रसिद्ध ऑनलाईन निविदेअंती दि. १३/०८/२०२४ अन्वये सदर कामाचे कार्यारंभ आदेश निम्ननिविदाकार मे. न्याती इंजिनियर्स व कन्सल्टंट प्रा. लि. यांना देण्यात आले आहेत.

" Maharashtra Tertiary Care and Medical Education Sector Development Program (Loan No. ४३९३)" या प्रकल्पांतर्गत आशियाई विकास बँकेमार्फत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये

विभागास धोरणात्मक /पायाभुत सुविधांच्या विकासासाठी कर्ज स्वरुपात निधी उपलब्ध झालेला आहे. याच अनुषंगाने मा. मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि.०९/०४/२०२५ रोजी (संदर्भ क्र. ४) झालेल्या आढावा बैठकीत आशियाई विकास बँकेमार्फत वैद्यकीय शिक्षण विभागास धोरणात्मक/ पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी कर्ज स्वरूपात प्राप्त झालेल्या १५० मिलीयन डॉलर्स (रू.१२६०.५९ कोटी) इतक्या निधीपैकी रु.३६१.५० कोटी इतका निधी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारीतील धाराशिव येथिल ५०० खाटांचे स्वतंत्र जिल्हा रुग्णालय स्थापन करण्यासाठी उपलब्ध करून देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

आशियाई विकास बँकेकडून प्राप्त कर्ज रक्कमेतून धाराशिव जिल्हा रुग्णालय बांधकामासाठी रु. ३६१.५० कोटी सार्वजनिक आरोग्य विभागास वर्ग करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या निर्देशानुसार वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग यांच्या दि. २७/०१/२०२६ (संदर्भ क्र. ६) रोजीच्या पत्रान्वये रु. ३६१.५० कोटी निधीपैकी प्रथम टप्प्यात रु. ५० कोटी इतका निधी उपलब्ध करुन देण्यात आला असून उर्वरित रु. ३११.५० कोटी एकरकमी सार्वजनिक आरोग्य विभागाच्या “धाराशिव जिल्हा रुग्णालय बांधकाम निधी” या नावाने IDBI बँक, मुंबई येथिल खात्यात तातडीने वर्ग करण्याबाबत मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेनुसार वैद्यकीय शिक्षण विभागास कळविण्यात आले आहे.

मा. मंत्री (परिवहन) व मा. मंत्री (सा.आ. व कु.क.) महोदयांच्या अध्यक्षतेखाली दि. ०६/०३/२०२६ रोजी (संदर्भ क्र.५) झालेल्या बैठकीत ५०० खाटांचे धाराशिव जिल्हा रुग्णालय व निवासी इमारत बांधकाम तसेच जिल्हा रुग्णालय रुग्णसेवेकरीता कार्यान्वित करण्यासाठी लागणारे सर्व रुग्णालय फर्निचर व उपकरणांवरील खर्चासह रु. ३६१.५० कोटी इतक्या खर्च मर्यादेत बांधकाम एजन्सी मे. न्याती इंजिनिअर्स अँड कन्संल्टंट प्रा. लिमिटेड यांनी Turn Key बेसिस तत्वावर पुर्ण करुन देण्यास मान्य केले आहे. सबब, धाराशिव जिल्हा रुग्णालय बांधकाम सुरु करण्याच्या अनुषंगाने अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव यांच्या दि. १८/०६/२०२६ च्या (संदर्भ क्र. ७) पत्रान्वये बांधकाम निविदेतील खंड १९.२.१ भाग-२ नुसार Mobilization Advance आणि (I.I.T.) व ३३ के. व्ही. एच. टी. च्या विद्युत वाहिनी इतरत्र स्थंलातर करणेकरीता निधी मागणी प्रस्ताव शासनमान्यतेसाठी सादर केला आहे. त्याअनुषंगाने धाराशिव येथील ५०० खाटांचे स्वतंत्र जिल्हा रुग्णालय बांधकामासाठी Mobilization Advance व विद्युत वाहिनी स्थंलातर करणेकामी निधी उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय-

५०० खाटांचे धाराशिव जिल्हा रुग्णालय व निवासी इमारत बांधकामासाठी प्रसिद्ध निविदेतील अटी व शर्तीनुसार मे. न्याती इंजिनिअर्स अँड कन्संल्टंट प्रा. लिमिटेड ही बांधकाम कंत्राटदार एजन्सी अंतिमत: पात्र ठरली आहे. "Maharashtra Tertiary Care and Medical Education Sector Development Program (Loan No. ४३९३)" या प्रकल्पांतर्गत आशियाई विकास बँकेमार्फत वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागास धोरणात्मक/ पायाभुत सुविधांच्या विकासासाठी कर्ज स्वरुपात प्राप्त निधीपैकी (१५० मिलीयन डॉलर्स /रू.१२६०.५९ कोटी) मा. मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेने वजा

निर्देशानुसार ५०० खाटांचे जिल्हा रुग्णालय स्थापन करण्याकरीता रु. ३६१.५० कोटीपैकी वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाकडून वर्ग झालेल्या रु. ५० कोटी रक्कमेतून धाराशिव जिल्हा रुग्णालय बांधकाम सुरु करण्याच्या अनुषंगाने बांधकाम निविदेतील खंड १९.२.१ भाग-२ नुसार मूळ निविदा रक्कम रु. २६९.१२ कोटी इतक्या रकमेच्या ५ टक्के रक्कम Mobilization Advance म्हणून रु. १३.४६ कोटी आणि (I.I.T.) व बांधकामाधिन रुग्णालय जागेवर असलेले ३३ के. व्ही. एच. टी. च्या विद्युत वाहिनी इतरत्र स्थंलातर करणेकरीता रु. ५.०० कोटी असे एकुण रु. १८.४६ कोटी इतका निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांच्या नावे वितरीत करण्यास याद्वारे शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर निधी खालील नमूद बँक खात्यातून अदा करण्यात यावा.

बँकेचे नाव	औद्योगिक विकास बँक ऑफ इंडिया (IDBI)
खाते क्रमांक	०००४१०४०००३२१९१४
कस्टमर आयडी	१०५११८४२०
IFSC कोड	IBKL०००००४
पता	औद्योगिक विकास बैंक ऑफ इंडिया (IDBI), नरीमन पॉईंट, मुंबई-४०००३२

शाखा व्यवस्थापक, आय.डी.बी.आय., नरिमन पॉईंट, मुंबई यांना आदेशित करण्यात येते की, उपरोक्त नमूद निधी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांच्या नावे असलेल्या पुढील बँक खात्यात वर्ग करुन तसे शासनास अवगत करावे.

बँकेचे नाव	ICICI बँक
खाते क्रमांक	१६३७०५००६२७९
IFSC कोड	ICIC०००१६३७
पता	ICICI बँक लिमिटेड, धाराशिव-४१३५०१

३. सदर निधी पुढील अटी-शर्तीच्या अधीन राहून वितरीत करण्यात येत आहे:-

१) मूळ बांधकाम निविदेपैकी ५ टक्के Mobilization Advance म्हणून उपलब्ध करुन देण्यात येत असलेल्या निधीचे उपयोगिता प्रमाणपत्र (Utilization Certificate) तसेच कामाची प्रगती (Work Progress Report) याबाबतची कागदपत्रे कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांचेमार्फत शासनास सादर करणे अनिवार्य राहील. तद्नंतरच पुढील निधीची मागणी करता येईल.

२) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांनी रुग्णालय बांधकामासाठी उपलब्ध झालेल्या निधीबाबत स्वतंत्र लेखे ठेवणे आवश्यक राहील.

३) वितरित निधीच्या विनियोजनाचा तपशिल राज्य शासन/केंद्र शासन/आशियाई विकास बँक

यांना सादर करण्यासाठी तसेच लेखापरीक्षणासाठी शासनास/शासनाने नियुक्त केलेल्या यंत्रणेस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

४) उपरोक्त निधी विहित कार्यपध्दतीने संबंधितांना अदा करण्याची व निश्चित करण्यात आलेल्या घटकांच्या प्रयोजनासाठीच खर्च होईल याची खबरदारी घेण्याची जबाबदारी कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांची राहील.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७०९१०५६५३१४१७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

KAILAS TARACHAND SALUNKE

Digitally signed by KAILAS TARACHAND SALUNKE
DN: cn=KAILAS TARACHAND SALUNKE, o, ou, email=kailas.salunke@nic.in, c=US
Date: 2026.07.09 11:36:09 +05'30'

(कैलास साळुंके)
शासनाचे सहसचिव

प्रत,

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,मंत्रालय, मुंबई.
२. मुख्य कार्यकारी अधिकारी, मित्रा, मुंबई.
३. मुख्य प्रबंधक, आशियाई विकास बँक.
४. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक,राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई.
५. महालेखापाल, महाराष्ट्र-१/२ (लेखा परिक्षा) /(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/नागपूर.
६. शाखा व्यवस्थापक, औद्योगिक विकास बैंक ऑफ इंडिया (IDBI), नरीमन पॉईंट, मुंबई.
७. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, धाराशिव.
८. मे. न्याती इंजिनिअर्स अँड कन्संल्टंट्स प्रा. लिमिटेड.
९. उपसचिव (शिक्षण-१), वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
११. मा.राज्यमंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई.
१२. संचालक-१/२,आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई/पुणे.
१३. सहसंचालक, आरोग्य सेवा, (रुग्णालये-राज्यस्तर),मुंबई.
१४. शाखा प्रबंधक, औद्योगिक विकास बैंक ऑफ इंडिया (IDBI), नरीमन पॉईंट, मुंबई.
१५. उपसंचालक, आरोग्य सेवा, लातूर मंडळ, लातूर.
१६. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव.

१७. नियोजन विभाग,(का.१४७२) मंत्रालय,मुंबई.

१८. वित्त विभाग (व्यय-१३), मंत्रालय, मुंबई.

१९. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२०. कार्यासन अधिकारी (अर्थसंकल्प), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई.

२१. निवडनस्ती (पासु-२)